एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मावळ (ग्रामीण)
बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय
ए.बा.वि.से.यो.प्रकल्प मावळ पंचायत समिती जि.पुणे
Email Id:- cdpomaval@gmail.com

जा.क्र.एबाविसेयो/आस्था/कावि/पदभरती/325/2026 दि. 01/07/2026

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मावळ पुणे जिल्हा परिषद पुणे

# अंगणवाडी सेविका / मदतनीस पद भरती जाहीर प्रगटन / जाहिरात सन - 2026

**संदर्भ** :- 1. महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. एबावि-2022/प्र.क्र.94/का-6 दिनांक 02 फेब्रुवारी 2023.
2. महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. एबावि-2022/प्र.क्र-94/का-6 दिनांक 30 जानेवारी 2025.
3. मा. आयुक्त यांचे पत्र, जा.क्र. एबाविसेयो/अंगणवाडी/का-7/2024-25/517,नवी मुंबई, दिनांक - 31/01/2025

**जाहिरात क्र. 01/2026**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प **मावळ** प्रकल्पांतर्गत खालील ग्रामपंचायतीच्या महसुली गाव कार्यक्षेत्रात केंद्र शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत रिक्त अंगणवाडी पदांकरीता उपरोक्त संदर्भ क्र. 1 ते 3 नुसार सरळ नियुक्तीने (By Nomination) अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधनी पदासाठी जाहिरातीमधील नमुद अटी व शर्तींची पुर्तता करणारे पात्र महिला उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात केवळ ऑनलाईन पद्धतीने या संकेतस्थळावर https://zppune-wcd.chanakyasoft.com **दि. 06/07/2026 ते दि. 24/07/2026 (शासकीय सुट्या वगळून) रोजी अखेर पर्यंत** अर्ज मागविण्यात येत आहेत.

## 2. रिक्त पदांचा तपशिल

### 2.1) रिक्त पदाचे नाव- अंगणवाडी सेविका -05

| अ.क्र. | ग्राम पंचायत नाव | महसुली गावाचे नाव | अंगणवाडी केंद्राचे नाव | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | चांदखेड | चांदखेड | चांदखेड 1 | १ |
| २ | गेव्हंडेआपटी | आतवण | आतवण | १ |
| 3 | वरसोली | वरसोली | वरसोली | 1 |
| 4 | कान्हे | कान्हे | कान्हे 1 | 1 |
| 5 | नउलाखउंब्रे | बधलवाडी | बधलवाडी | 1 |

### 2.2.) रिक्त पदाचे नाव: अंगणवाडी मदतनीस -25

| अ. क्र. | ग्राम पंचायत नाव | महसुली गावाचे नाव | अंगणवाडी केंद्राचे नाव | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | धामणे | धामणे | धामणे 2 | १ |
| 2 | शिरगांव | शिरगांव | शिरगांव | १ |
| 3 | सोमाटणे | सोमाटणे | चौराईसिटी | १ |
| 4 | सोमाटणे | सोमाटणे | चौराईनगर | १ |
| 5 | वाकसई | वाकसई | वाकसाई | १ |
| 6 | कुसगांव | कुसगांव | ओळकाईवाडी | १ |
| 7 | डोंगरगांव | डोंगरगांव | वेताळनगर | १ |
| 8 | गेव्हंडेआपटी | आतवण | आतवण | १ |
| 9 | वरसोली | वरसोली | वरसोली 2 | १ |
| 10 | कुणेनामा | कुणेनामा | कुणेनामा | १ |
| 11 | खडकाळा | खडकाळा | खडकाळा माऊलीनगर | १ |
| 12 | साते | साते | नवघणेवस्ती साते | १ |
| 13 | साते | साते | ब्राम्हणवाडी साते | १ |
| 14 | माले | पिंपरी | पिंपरी | १ |
| 15 | टाकवे | फळणे | कातकरीवस्ती | १ |
| 16 | इंगळून | कुणेवाडी | कुणेवाडी | १ |
| 17 | घोणशेत | वाऊंड | वाऊंड | १ |
| 18 | वडेश्वरा | माऊ | माऊ | १ |
| 19 | इंदुरी | इंदुरी | इंदुरी 1 | १ |
| 20 | सुदुंबरे | सुदुंबरे | गणेशनगर | १ |
| 21 | निगडे | - | निगडे गावठाण | 1 |
| 22 | काले | काले | कॉलनी 1 | |
| 23 | महागांव | मालेवाडी | मालेवाडी | 1 |
| 24 | मोरवे | कोळे | कोळे | 1 |
| 25 | अजिवली | जवन | जवन - 3 | 1 |

**3) पात्रता:**

**3.1) शैक्षणिक पात्रता:**

| अ.क्र. | पदाचे नाव | किमान आवश्यक शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1 | अंगणवाडी सेविका/मदतनीस | इयता बारावी उत्तीर्ण अथवा समकक्ष |

3.1.1) तसेच किमान शैक्षणिक अर्हतेच्या वरील सर्व शैक्षणिक पात्रतेच्या जसे पदवी, पदव्युत्तर, डी.एड, बी.एड., MS-CTT व समकक्ष इ. असल्यास त्याची सर्व सुस्पष्ट गुणपत्रिका (पास/नापास) ज्यावरुन टक्केवारी निश्चित करता येईल अशा सर्व गुणपत्रिकेच्या छायांकित प्रती सक्षम प्राधिकारी यांचेकडुन साक्षांकित करून घेउन अर्जासोबत जोडाव्यात. गुणपत्रिका / प्रमाणपत्र जोडले नसेल तर गुण देय होणार नाहीत.

**3.2) वास्तव्य (स्थानिक रहिवासी असणे) अट:** अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदाकरीता अर्जदार महिला ही त्या गावातील ग्रामपंचायत नव्हे तर फक्त महसुली गाव वाडी /वस्ती/पाडे यातीलच उमेदवारांना स्थानीक समजण्यात येईल व अशी महिला उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहील. याकरिता तहसिलदार यांचेद्वारे देणेत आलेला रहिवासी दाखला ग्राह्य धरणेत येईल.

**3.3) वयोमर्यादा:** वरील सर्व पदासाठी अर्ज करण्याच्या आरंभीच्या दिनांक वेळीचे वयाची अट किमान 18 वर्षे पूर्ण व कमाल 35 वर्षे अशी आहे. तथापि विधवा उमेदवारांसाठी ही वयोमार्यादा कमाल 40 वर्ष राहील. या करीता उमेदवाराने जन्मतारखेचा दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (T.C.) अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील.

**3.4) भाषेचे ज्ञान** : मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने इयत्ता 10 वी अथवा शासन निर्णय दिनांक - 02 फेब्रुवारी 2023 मधील परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या शौक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असे आवश्यक राहील.

**3.5) लहान कुटुंब:** अंगणवाडी सेविकाव अंगणवाडी मदतनिस या पदांवरील वेट व सरळ सेवेनेनियुक्तीसाठी लहान कुटुंबाची अट खालीलप्रमाणे लागू राहील.

3.5.1 )लहान कुटुंब याचा अर्थ, उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये.

3.5.2) उमेदवाराला दोन हयात अपत्यांपेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतून तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल. तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) असुन देखील तिसरे अपत्य झाल्यास त्यांच्या सेवासमाप्त करण्यात येईल.

3.5.3) उमेदवाराने लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र परिशिष्ट "ब" अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. अविवाहित महिला उमेदवारांनी सुध्दा 'लागू नाही' असे नमुद करुन प्रतिज्ञापत्र सादर करणेआवश्यक.

**4) अतिरिक्त गुण :**

**4.1) विधवा व अनाथ** :- विधवा व अनाथ उमेदवारांच्या बाबतीत अशा उमेदवारास परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केल्यानुसार 10 अतिरिक्त गुण कागदपत्र पडताळणी अंती पहिली गुणवत्ता यादी तयार करताना देण्यात येतील. (विधवा असल्याचा दाखला यासाठी नव-याच्या मृत्यू नोंद दाखल्यास पुनर्विवाह न केल्याचे

स्वयंघोषणापत्र जोडण्यात यावे. अनाथ असल्याबाबतचे महिला बाल विकास विभाग यांचे कडून प्राप्त प्रमाणपत्र जोडावे.)

**4.2) अनुभव असल्यास:-** एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प योजनेची अंगणवाडी सेविका/ मिनी सेविका / मदतनीस, किमान 2 वर्षे अनुभव असल्यास बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडुन प्राप्त अनुभव प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे, खाजगी मान्यताप्राप्त अथवा खाजगी अनुदानित संस्थेत सेवा अनुभव ग्राह्य धरता येणार नाही.

**4.3) जातीचे प्रमाणपत्र:** अर्जदार मागासवर्गीय प्रवर्गात मोडत (अनुसूचित जाती / जमाती , विमुक्त जाती, भटक्या जमाती, विषेश मागास प्रवर्ग किंवा इतर मागास वर्गीय प्रवर्ग, SEBC ) असल्यास सक्षम प्राधिका-याचे जातीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जात प्रमाणपत्रासाठी पोहच पावती व इतर पुरावा ग्राह्य धरला जाणार नाही. शंकास्पद/क्लिष्ट प्रकरणात जात पडताळणी प्रमाणपत्राची मागणी कार्यालयामार्फत केली जाऊ शकते.

**5) बदली:** अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे तसेच ती स्थानिक रहिवाशी असावी या केंद्र शासनाच्या मार्गदर्शकसुचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचा-यांना बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही.

**6) सेवा समाप्तीचे वय:** शासन निर्णय दिनांक 02 फेब्रुवारी 2023 अन्वये नियुक्त होणा-या अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनिस यांची सेवा 60 वर्षे पूर्ण होई पर्यंत किंवा त्या शाररिकदृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत सुरू ठेवण्यात येईल.

**7) मानधन:** अंगणवाडी सेविका व मदतनीस ही पदे मानधनी आहेत तसेच या पदाकरिता सेवानिक मानधन व इतरही बाबतीत (या जाहीरनाम्यात उल्लेखित नसलेले अटी व शर्ती) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रक (ध्येय व धोरणे) लागु राहतील. ही पदे नियमित शासकीय पदे नसल्यामुळे या पदास शासकीय सेवेच्या कोणत्याही सवलती उपलब्ध नाहीत.

8) **उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना -**

8.1 अर्जदार महिला उमेदवार असणे आवश्यक आहे. विवाहीत अथवा अविवाहीत असा कोणताही भेद करण्यात आलेला नाही.

8.2 उमेदवारांनी अंगणवाडी पदभरती करिता https://zppune-wcd.chanakyasoft.com या संकेत स्थळावर जाउन विहीत मुदतीत सर्व दावे आणि त्याच्या पुष्टयर्थ सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करताना सर्व छायांकित प्रती या सक्षम प्राधिका-याकडुन सांक्षाकित करून प्रकल्प ऑनलाईन अर्ज करावा.ऑफ़ लाईन अर्ज कोणत्याही परिस्थिती मध्ये स्विकारला जाणार नाही.

8.3 अर्ज करण्याच्या अंतीम दिनांका पर्यंतचेच उमेदवारांनी धारण केलेल्या शैक्षणिक पात्रता व प्राधान्य बाबतचे दावे ग्राह्य धरण्यात येतील तसेच त्या दाव्यांबाबतची कागदपत्रे अर्ज करण्याच्या अंतीम दिनांका पर्यंत

ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे. अंतीम दिनांका नंतर केलेले दावे किंवा सादर केलेली कागद पत्रे यांचा विचार केला जाणार नाही.

8.4) उमेदवाराचे वयाकरीता जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरण्यात येईल.

8.5) उमेदवाराने तहसिलदार यांचे कडुन प्राप्त केलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल,

8.6) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्रा साठी अर्जा सोबत प्राप्त परिशिष्ठ उमेदवाराने स्वतः भरून द्यायचे आहे.

8.7) अर्जदाराचे नावात बदल असल्यास सक्षम अधिकारी यांचा विवाह नोंदणी दाखला किंवा नावात बदल असल्याबाबतचे राजपत्र (Gazette) किंवा नोंदणीकृत (सेतु/नोटरी) हलफनामा/शपथपत्र जोडण्यात यावे.

8.8) अर्जासोबत जोडलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे नंतर भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर खोटी, बनावट, खाडाखोड केलेली, अवैध, संबधित शासन आदेश / नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम अधिका-याने प्रदान न केलेली असल्याचे आढळून आल्यास प्रकल्प कार्यालयामार्फत घेण्यात येणा-या निवडीपासुन उमेदवारास कायमस्वरूपी प्रतिरोधित करण्यात येईल. शिवाय उमेदवाराची शिफारस झाली असल्यास ती पूर्वलक्षी प्रभावाने रदद करणेत येईल, याबाबत संबंधीतांशी कोणताही पत्रव्यवहार कार्यालयामार्फत केला जाणार नाही. तसेच शासनाची फसवणुकीचा आरोप ठेऊन अर्जदार व सम्बंधीताविरुद्ध गुन्हेगारी स्वरूपाचा खटला दाखल करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

8.9) अंगणवाडी पदभरती मधून निवडलेल्या सर्व उमेदवारास महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि 2006/प्र.क. 300/का.06 दि.12 एप्रिल 2007 लागू राहील. ज्या द्वारे कामात कर्तव्यात गैरव्यवहार करणा-या अंगणवाडीसेविका व मदतनीस यांना मानधनी सेवेतून कमी करण्यात येईल.

8.10) अंगणवाडी सेविकाव अंगणवाडी मदतनिस या दोन्ही पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास दोन्ही पदांसाठी स्वतंत्र अर्ज करणेत यावेत.

8.11) अंगणवाडी केंद्र ज्या महसुल गांवामध्ये असेल त्याच महसुल गावामधील स्थानिक रहिवासी असलेला उमेदवार असावा. स्थानिक रहिवाशी नसल्यास अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

8.12) प्राथमिक गुणवत्ता यादीतील कोणत्याही उमेदवाराची वैयक्तिक माहिती खोटी असल्याची इतर अर्ज केलेल्या उमेदवाराची तक्रार असल्यास प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यापासून 10 दिवसाच्या आत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही.

8.13) अंगणवाडी सेविका व मदतनीस पदाकरिता अंतिम निवड झाल्यास उमेदवारास शासन निर्णय क्र. एबावि-2010/प्र.क्र. 124/का-6, दि. 05 ऑगस्ट 2010 नुसार पंचायत राज संस्थांच्या / जिल्हा परिषद/ पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य असल्यास कोणत्याही एका पदाचा राजीनामा द्यावा लागेल.

8.14) नियुक्ती झालेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी कोणत्याही प्रकारची इतर निमशासकीय/ खाजगी नोकरी करता कामा नये अगर राजकारणात भाग घेता कामा नये तसे आढळून आल्यास त्याची नियुक्ती आपोआप रद्द समजण्यात येईल.

8.15) सदर जाहीर प्रगटन / जाहिरातीत काही बदल अटी / नियम वाढविणे / पुढे ढकलणे / कोणतेही वेळी, कोणत्याही टप्यावर स्थगित किंवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मावळ यांना राहतील.

8.16) ऑनलाईन अर्ज करण्याची संकेतस्थळावर https://zppune-wcd.chanakyasoft.com अंतीम दिनांक 24 जुलै 2026 (संध्याकाळी 6:15)आहे

HThakur

(नेहा अरविंद ठाकूर)
बाल विकास प्रकल्प अधिकारी
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
प्रकल्प मावळ (ग्रामीण) जि.प.पुणे

बाल विकास प्रकल्प अधिकारी
ए.बा.वि.से.यो. प्रकल्प मावळ, जि. पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

1.मा. जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक)पुणे जिल्हा परिषद पुणे .

2.मा.गटविकास अधिकारी , पंचायत समिती मावळ .

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मावळ (ग्रामीण)
बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय
ए.बा.वि.से.यो.प्रकल्प मावळ पंचायत समिती जि.पुणे
Email Id:- cdpomaval@gmail.com

जाक्र.एबाविसेयो/आस्था/ 326/२०२६ दिनांक - 01/०7/२०२६

जाहिरात – अंगणवाडी सेविका व मदतनीस रिक्त पद भरती -2026

वाचा : 1. महाराष्ट्र शासन महला व बाल विकास विभाग शासन नणय क्रमांक एबावि- 2022 प्र.क्र.94/का.6 दिनांक 02/02/2023
2. महाराष्ट्र शासन महला व बाल विकास विभाग शासन नणय क्रमांक एबावि- 2022 प्र.क्र.175/का.6 दिनांक 10/01/2024
3.मा. आयुक्त, एका क बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परपत्रक क्र. एबाविसेयो/अंगणवाडी/का-7/639/2023-24 दिनांक 08/02/2024
४. महला व बाल विकास विभाग शासन नणय क्रमांक एबावी -2022 /प्र.क्र.94/का-६ दि.३०/०१/२०२५
५ .मा. आयुक्त, एका क बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परपत्रक क्र. एबाविसेयो/अंगणवाडी/का-7/517/2024-25 दिनांक 31/01/2025

---

एकामिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मावळ या प्रकल्पांतर्गत खालील गावांच्या कार्यक्षेत्रात केंद्र शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत रिक्त मंजूर अंगणवाड्यासाठी वरील संदर्भान्वये अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदासाठी पात्र महिला उमेदवाराकडून https://zppune-wcd.chanakyasoft.com या संकेतस्थळावरील लिंक वर विहित नमुन्यात केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज परिपूर्ण् कागदपत्रासह दि.06/०7/२०२६ ते दि.24/०७/२०२६ रोजी अखेर ( शासकीय सुट्ट्या वगळून ) मागवण्यात येत आहेत. रिक्त पदांचा तपशील संकेतस्थळावर प्रसिध्दी करण्यात येत आहे. तसेच सदरची जाहिरात खालील गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात प्रसिध्दी करण्यात आली आहे. सदर अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढून अर्जासोबत सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रे जोडून एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय मावळ येथे जमा करणेबाबत कळविण्यात यावे.

(नेहा अरविंद ठाकूर)
बाल विकास प्रकल्प अधिकारी
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
प्रकल्प मावळ (ग्रामीण) जि.प.पुणे

प्रत - संबधित ग्रामपंचायत विकास अधिकारी ता. मावळ

बाल विकास प्रकल्प अधिकारी
ए.बा.वि.से.यो. प्रकल्प मावळ, जि. पुणे

**रिक्त पदाचे नाव- अंगणवाडी सेविका -05**

| अ.क्र. | ग्राम पंचायत नाव | महसुली गावाचे नाव | अंगणवाडी केंद्राचे नाव | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | चांदखेड | चांदखेड | चांदखेड 1 | १ |
| २ | गेव्हंडेआपटी | आतवण | आतवण | १ |
| 3 | वरसोली | वरसोली | वरसोली | 1 |
| 4 | कान्हे | कान्हे | कान्हे 1 | 1 |
| 5 | नउलाखउंब्रे | बधलवाडी | बधलवाडी | 1 |

**रिक्त पदाचे नाव: अंगणवाडी मदतनीस -25**

| अ. क्र. | ग्राम पंचायत नाव | महसुली गावाचे नाव | अंगणवाडी केंद्राचे नाव | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | धामणे | धामणे | धामणे 2 | १ |
| 2 | शिरगांव | शिरगांव | शिरगांव | १ |
| 3 | सोमाटणे | सोमाटणे | चौराईशिटी | १ |
| 4 | सोमाटणे | सोमाटणे | चौराईनगर | १ |
| 5 | वाकसई | वाकसई | वाकसाई | १ |
| 6 | कुसगांव | कुसगांव | ओळकाईवाडी | १ |
| 7 | डोंगरगांव | डोंगरगांव | वेताळनगर | १ |
| 8 | गेव्हंडेआपटी | आतवण | आतवण | १ |
| 9 | वरसोली | वरसोली | वरसोली 2 | १ |
| 10 | कुणेनामा | कुणेनामा | कुणेनामा | १ |
| 11 | खडकाळा | खडकाळा | खडकाळा माऊलीनगर | १ |
| 12 | साते | साते | नवघणेवस्ती साते | १ |
| 13 | साते | साते | ब्राम्हणवाडी साते | १ |
| 14 | माले | पिंपरी | पिंपरी | १ |
| 15 | टाकवे | फळणे | कातकरीवस्ती | १ |
| 16 | इंगळून | कुणेवाडी | कुणेवाडी | १ |
| 17 | घोणशेत | वाऊंड | वाऊंड | १ |
| 18 | वडेश्वरा | माऊ | माऊ | १ |
| 19 | इंदुरी | इंदुरी | इंदुरी 1 | १ |
| 20 | सुदुंबरे | सुदुंबरे | गणेशनगर | १ |
| 21 | निगडे | - | निगडे गावठाण | 1 |
| 22 | काले | काले | कॉलनी 1 | 1 |
| 23 | महागांव | मालेवाडी | मालेवाडी | 1 |
| 24 | मोरवे | कोळे | कोळे | 1 |
| 25 | अजिवली | जवन | जवन - 3 | 1 |

वर नमुद केलेल्या रिक्त पदांसाठी खालील अटी व अर्हता प्राप्त करणा-या महिला उमेदवार विहित नमुन्यात केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज दिनांक 06/07/2026 ते दिनांक 24/07/2026 अखेर सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत करणेसाठी पात्र आहेत.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मावळ (ग्रामीण)
बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय
ए.बा.वि.से.यो.प्रकल्प मावळ पंचायत समिती जि.पुणे
Email Id:- cdpomaval@gmail.com

जाक्र.एबाविसेयो/आस्था/ 327/२०२६ दिनांक - 01/०7/२०२६

प्रती,

मा. जिल्हा कार्यक्रम अधिकारी,
महिला व बाल कल्याण विभाग
पुणे जिल्हा परिषद पुणे

विषय - अंगणवाडी सेविका व मदतनीस रिक्त पद भरती प्रक्रियेबाबत जाहीरात प्रसिध्द बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प मावळअंतर्गत 05अंगणवाडी सेविका व 26 मदतनीस पदे रिक्त आहेत.रिक्त पदांची भरती करणे करिता जाहिरात सोबत सादर करण्यात येत आहे. तरी ती ऑनलाईन प्रसिध्द करण्यात यावी हि विनंती.

(नेहा अरविंद ठाकूर)
बाल विकास प्रकल्प अधिकारी
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
प्रकल्प मावळ (ग्रामीण) जि.प.पुणे

**सहपत्र - अंगणवाडी सेविका व मदतनीस भरती जाहिरात**

बाल विकास प्रकल्प अधिकारी
ए.बा.वि.से.यो. प्रकल्प मावळ, जि. पुणे